**शपथेवर सुरु**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ७ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो.कॉ.१९९९/ सुनिल मुरलीधर पालवे,

वयः – ३५ वर्षे,

नेमणुक. – सोनई पोलिस स्टेशन, ता. नेवासा, जि.अ.नगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः–**

दि.०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी माझी जनरल ड्युटी होती. त्यादिवशी मल पो.ना. तमनर यांचा फोन आला व त्यांनी मला फोनद्वारे सांगितले की, एका इसमाने तलवारीचा फोटो स्टेटसला ठेवलेला आहे त्याची आपल्याला कारवाई करण्यासाठी जायचे आहे. त्यानंतर मी, पो.ना. तमनर, पो.हे.कॉ. श्री. गिते, पो.ना. राहूल यादव, पो.कॉ. अंबादास गिते व पो.कॉ. गुंजाळ असे सर्वजण आरोपी हारूण शेख या इसमाच्या घरी गेलो. तेथे पो.ना. तमनर यांनी सदर इसमास फोटो दाखवला व तलवार देण्यास सांगितले असता सदर इसम पोलीस स्टेशनला तलवार हजर करतो असे म्हणाला. त्यानंतर हारूण शेख अर्ध्या तासाने पोलीस स्टेशनला तलवार घेवून आला. त्यानंतर पो.ना. तमनर यांनी पंचनामा केला. पो.कॉ. शाम गुंजाळ यांनी फिर्याद दाखल केली. आरोपीने पोलीस स्टेशनला आणून दिलेली तलवार मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला एम.ओ. – अ वरील तलवार दाखविण्यात आली. ती तिच आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे. बी. इनामदार यांचेमार्फत सुरु–**

२. नेवासा शहरात मी साडेतीन वर्षे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून नोकरी केली. पो.ना. तमनर यांचा फोन आला तेव्हा मी नेवासा शहरातच होतो. नेवासा पोलीस स्टेशन ते नाईकवाडी मोहोल हे एक ते दिड कि.मी. अंतर आहे. नेवासा पोलीस स्टेशन पासून नाईकवाडी मोहोल येथे जाण्यासाठी गर्दी असेल तर २० मिनिटे वेळ लागतो. आम्ही जात होतो त्यावेळी गर्दी होती. आम्ही मोटारसायकलवर गेलो होतो. मी अंबादास गिते यांच्या गाडीवरून गेलो होतो. सदर गाडीचा क्रमांक मला सांगता येणार नाही. आम्ही गेलो त्यावेळी हारूण शेख घरी होता. आरोपीच्या घर नाईकवाडी मोहल्यामध्ये कुठे आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या घरी

गेलो नाही. आरोपीच्या घराचा दरवाजा कोणत्या दिशेस आहे हे मला सांगता येणार नाही. आरोपीच्या घराच्या आजूबाजूला पाण्याची टाकी आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. पो.ना. तमनर हे आधी आरोपीसोबत बोलत होते, आम्ही नंतर गेलो. पंचांची पुर्ण नावे मला सांगता येणार नाहीत. मी पंचांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, अशा तलवारी बाजारात कुठेही मिळतात.हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमालासारख्या तलवारी पोलीस स्टेशनला इतर गुन्ह्यातील मुद्देमाल म्हणून पडलेल्या असतात. हे मला माहित आहे की,हारूण शेख हे शांतता कमिटीचे सदस्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हारूण शेख हे शांतता कमिटेचे सदस्य असल्याने त्यांचे पोलीस स्टेशनला कायम येणे जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, नेवासा शहरात वादविवाद झाल्यास शांतता कमिटीचे सदस्य हे वादविवाद मिटवतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन व शांतता कमिटी मधील सदस्य यांच्यामध्ये वादविवाद होत राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या घरी गेलो नाही व असा कोणताही गुन्हा घडला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–

(**ए.एन.सरक**)

दिनांक–२२/०१/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,

नेवासा